# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६**
वेब-साईट www.mercindia.org.in

## जाहीर नोटीस

**प्रारुप महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २०१० बाबत जनतेचे अभिप्राय मागविण्यासाठी नोटीस**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (वितरण परवानेधारकांच्या कृतीची मानके, विद्युत पुरवठा सुरु करावयाचा कालावधी आणि भरपाईचे निश्चितीकरण) विनियम, २००५" च्या परिणामकारकतेचे मूल्यांकन करुन, ग्राहक, ग्राहकांचे प्रतिनिधी, वितरण परवानेधारक यांच्याकडून अभिप्राय व सूचना मागविल्या होत्या;

दरम्यानच्या काळात, नियामकांच्या मंचाने (फोरम ऑफ रेग्युलेटर्स) वितरण परवानेधारकांकरिता 'आदर्श कृतीच्या मानकां'चे विनियम प्रसिध्द केले असल्याने, 'आदर्श कृतीच्या मानकां'तील तरतुदीसुध्दा विचारात घेण्याचे ठरविण्यात आले;

यापूर्वी प्रस्तावित करण्यात आलेल्या सुधारणा, त्यावर आलेले अभिप्राय आणि 'आदर्श कृतीच्या मानकां'च्या विनियमांचे संकलन केल्यावर पूर्वीचे विनियम रद्द करुन नवीन विनियम करण्याचे ठरविण्यात आले आहे याबाबतचे प्रारुप विनियम आता तयार करण्यात आले असून ते आयोगाच्या **www.mercindia.org.in** या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहेत.

वरील प्रारुपावर जनतेकडून, वितरण परवानेधारक आणि हितसंबंधितांक्डून लेखी सूचना आणि/किंवा हरकती मागविण्यात येत आहेत. लेखी सूचना आणि/किंवा हरकती आयोगाचे सचिव यांना (१+५) सहा प्रतींमध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, १३ वा मजला, सेंटर क्र. १, जागतिक व्यापर केंद्र, कुलाबा, मुंबई-४०० ००५ या पत्त्यावर दिनांक १८ सप्टेंबर, २०१० रोजी किंवा त्यापूर्वी व्यक्तीशः, टपाल किंवा

फॅक्सद्वारे किंवा **secretary@mercindia.org.in** या ई-मेलवर पाठवाव्यात. १८ सप्टेंबर, २०१० रोजी किंवा त्यापूर्वी प्राप्त झालेल्या सूचना/हरकती आयोगाकडून विचारात घेण्यात येतील.

(के. एन. खवारे)
सचिव, मविनिआ

मुंबई,
दिनांक १८ ऑगस्ट, २०१०